॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon



## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.२२ (          ) संशोधनाच्या माध्यमातून व्यक्ती आणि समाज यांचा विकास साधता यावा यादृष्टीने समाजाभिमुख संशोधन करण्यावर विद्यार्थ्यांनी भर द्यावा असे आवाहन प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात सामाजिक शास्त्र प्रशाळा आणि विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने संशोधन प्रकल्प सादरीकरण कार्यशाळा दि. २२ नोव्हेंबर रोजी घेण्यात आली. या कार्यशाळेचे उद्घाटन करतांना प्रा. इंगळे बोलत होते. त्यावेळी प्रशाळेचे प्रभारी संचालक प्रा. अजय पाटील, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. जयेंद्र लेकुरवाळे, प्रा. विशाल पराते, डॉ. उमेश गोगडीया, डॉ. जुगलकिशोर दुबे यांची उपस्थिती होती.

प्रा. इंगळे म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या संशोधन वृत्तीला चालना देण्यासाठी अशाप्रकारची कार्यशाळा महत्वाची ठरते. विद्यार्थ्यांनी वस्तुनिष्ठ तथ्यावर अधारीत संशोधन करणे गरजेचे आहे. प्रारंभी समन्वयक डॉ. मनोज इंगोले यांनी प्रास्ताविक केले. डॉ. समाधान बनसोडे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. डॉ. उमेश गोगडीया यांनी आभार मानले. उद्घाटनानंतर डॉ. जुगलकिशोर दुबे यांनी 'संशोधन विषय निवड साहित्याचा आढावा, उद्दीष्ट्ये आणि गृहितकांची निर्मिती' या विषयावर तसेच डॉ. मनीषा इंदाणी यांनी संशोधन आराखडा तर डॉ. गोगडीया तथ्यसंकलन आणि विश्लेषण या विषयावर मार्गदर्शन केले. दुपारच्या सत्रात डॉ. विकास पाटील यांनी संशोधन कार्यात आयसीटीचा वापर यावर मांडणी केली. डॉ. रमेश सरदार यांनी आविष्कार संशोधन स्पर्धेविषयी माहिती दिली.

**बातमी क्र. २**

जळगाव दि. २२ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रात प्राध्यापक प्रबोधिनी अंतर्गत डॉ. सुदर्शन घोगरे यांनी रवींद्रनाथ टागोर लिखीत 'गितांजली' व प्रा. म.सु. पगारे लिखीत 'बा तथागता' या साहित्य कृतींवर व्याख्यान दिले. अध्यक्षस्थानी प्रा.म.सु. पगारे होते. या साहित्याची मांडणी, आशय आणि कवितांमधील प्रतिके व प्रतिमा यावर त्यांनी मांडणी केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रतिभा गलवाडे यांनी केले.

.......................................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: २२ नोव्हेंबर, २०२४

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी